**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.**

मंगळवार, दि. 28.02.2017 रोजी दुपारी 3.30 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. देशमुख मंगला गजानन, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| तेहरा अनुजा अमितसिंह | फारुख हुसेन कासीम साब |
| शर्मा पुष्पाताई राजेश | कोकुलवार लक्ष्मीबाई तुळशीराम |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेशसिंह अशोकसिंह |
| मोकले सोनाबाई रामचंद्र | स. जानी म. कासीम |
| कल्याणकर बालाजी दत्तराव | गुरुखुदे सुंदरलाल किशनलाल |
| जाधव जयश्री आनंद | अंजुम बेगम शेख अफरोज |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य, प्राधिकारी अधिकारी तथा उपआयुक्त (विकास) श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त (महसुल) तथा मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, मुख्य लेखा परिक्षक श्री आर.एस. कोलगणे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**सभापती** दिनांक 28.02.2017 च्या अंदाजपत्रक मंजुर करण्यापुर्वी स. सदस्या अभ्यास करण्यासाठी वेळ मागीतल्यामुळे सदरची सभा सर्वानुमते तहकुब करण्यात येते. तसेच नियमीत स्थायी समितीच्या सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येतो

**अनुजा तेहरा** स्वच्छ महाराष्ट्र अभियांनाअंतर्गत शौचालयाचे सर्व्हेचे काम सुरु आहे काय. ज्या लोकांना शौचालय नाहीत त्यांना शौचालय मिळण्यासाठी आहेत त्यांचा सर्व्हे कधी होणार आहे याची माहिती सभागृहात देण्यात यावी. आपण सध्या मालमत्ताची कर वसुली करत आहोत. त्या अंतर्गत पीव्हीआर टॉकीजच्या आपण 26 लक्ष रुपये जमा न केल्याने सिल केले आहे. तसेच आपण गणेश टॉकीजच्याही सिल लावला आहे.

**उपायुक्त(महसुल)** गणेश टॉकीजला आपण वारंवार नोटीसा पत्र व्यवहार केलेला आहे. तरी ही त्यांनी कर नियमीत भरलेला नसल्याने शास्तीवरील दंड त्यांना आकारण्यात आलेला आहे.रुपये 26 लाख रुपये ही चालू वर्षाची मागणी आहे.त्यावरील व्याज देखील वाढत चाललेले आहे.

**उमेश चव्हाण** आपल्याला वसुली करावयाची आहे त्यासाठी शास्तीवरी दंड आपण कमी करावा अशी मी विनंती करतो. सर्वसाधारण सभेचा ठराव पास करुन शास्ती माफ करता येईल असे मला वाटते.

**विषय क्रं.०१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत SGGS स्टेडीयम परिसरातील कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाची रंगरंगोटी व दुरुस्ती विधुतीकरण करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार रुपये ५०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

करिता नावाशमनपा हद्दीत SGGS स्टेडीयम परिसरातील कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाची रंगरंगोटी व दुरुस्ती विधुतीकरण करण्याच्या कामासाठी लागणारी रक्कम रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष फक्त) यास अर्थसंकल्प २०१६-१७ मधील इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन प्रशासकीय व आर्थीक मंजुरीसाठीचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकिय व आर्थीक मंजुरी देण्यात येते.

**ठराव क्रं.१३४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत SGGS स्टेडीयम परिसरातील कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाची रंगरंगोटी व दुरुस्ती विधुतीकरण करणेसाठी या विभागाचे उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करुन आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादरसुची २०१५-१६ नुसार रुपये ५०,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन सादर केले आहे.

करिता नावाशमनपा हद्दीत SGGS स्टेडीयम परिसरातील कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहाची रंगरंगोटी व दुरुस्ती विधुतीकरण करण्याच्या कामासाठी लागणारी रक्कम रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लक्ष फक्त) यास अर्थसंकल्प २०१६-१७ मधील इमारत दुरुस्ती या लेखाशिर्षातुन प्रशासकीय व आर्थीक मंजुरी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं.०२**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दि. १४.१०.२०१६ रोजीच्या ठाव क्रं ९४ अन्वये रुपये १५०.०० कोटीच्या कर्ज उभारणचा ठराव मंजुर केला होता त्यानुसार महापालिका प्रशासनाने कर्ज उभारणीसाठी पुढील एकूण ०७ वित्तीय संस्थांना / बँकांना मागणी पत्र पाठविले होते.

(१) सटेट बँक ऑफ हैद्राबाद नांदेड (२) स्टेट बँक ऑफ इंडिया नांदेड (३) अक्सीस बँक नांदेड (४) PMDO चेन्नई (५) HUDCO मुंबई (६) MUNIFRA मुंबई (७) ADB जपान

त्यापैकी HUDCO व PMDO या वित्तय संस्थांनी सर्व औपचारीक कागदपत्रे व प्रक्रिया पूर्ण करुन त्यांच्या कर्जा विषयीच्या अटी / शर्ती व व्याजदर महापालिकेला सादर केल्या आहेत सदर मुख्य अटी / शर्ती व दर या सविस्तरपणे सोबत सादर केल्या आहेत. (रक्कम कोटीत)

| विवरण | HUDCO | PMDO | कर्ज फेडीची मुदत |
|---|---|---|---|
| व्याज दर | ९.४३% | १०.५०% | -- |
| मुद्दल | १५०.०० | १५०.०० | १५ वर्षे |
| व्याज व इतर खर्च | १००.५५ | ११८.७७ | १५ वर्षे |
| एकूण | २५०.५५ | २५८.७७ | |

मे. साले अन्ड कंपनीने सदर अटी / शर्ती व व्याजदराचा तुलनात्मक अभ्यास करुन सविस्तर अहवाल दिला आहे त्यांच्या मते HUDCO या संस्थेकडून कर्ज उभारणी करणे स्वस्त दराचे ठरेल. सदर प्रस्ताव हा महापालिकेच्या आर्थीक विषयाशी निगडीत असल्यामुळे HUDCO संसथेकडून कर्ज उभारणीस स्थायी समितीने मान्यता यावी. तसेच HUDCO या संस्थेकडून कर्ज उभारणी करीत असतांना कांही अडचण निर्माण झाल्यास PMDO या संस्थेकडून कर्ज उभारणीची मान्यता याच ठरावान्वये देण्यात यावी स्थायी समितीने मान्यता दिल्या नंतर सदर कर्ज प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर कर्जाची पुढील करार प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाकडून कर्ज मंजुरी मिळाल्यानंतर करावयाच्या सर्व आवश्यक नविन कर्जाची कार्यपध्दती पुर्ण करण्याकरिता तसेच जुने कर्ज परत करण्यासंबंधीच्या ही अटी व शर्ती पुर्ण करण्याकरिता स्थायी समितीने मा. महापालिका आयुक्त यांना संबंधीत सर्व आर्थीक करार (Financial Agreement) सुरक्षा अभिलेखे (Security Documents), हमी पत्रे (Undertakings), डीडस (Deeds) आणि लिखाण करण्याच्या (To execute) नुसार सुचविलेल्या व त्यांना मान्य असलेल्या बदलास व दुरुस्त्या (Amendments) करण्यास तसेच गहाण खत (To create Mortgage) तयार करुन आवश्यक असल्यास संबंधीत रजिस्ट्रार (Registrar) कडे (Indenture of Mortgage) व इतर Security Documents ठेवण्यास याच ठरावाव्दारे प्राधिकृत करावे.

करिता स्थायी समिती नावाशमनपा नांदेड सभेची वरील प्रमाणे सदरील प्रस्तावास मंजुरीस्तव सादर.

**उमेश चव्हाण** दिडशे कोटीचे कर्ज घेण्यास मला वाटते काही हरकत नाही परंतू या दिडशे कोटीपैकी 60 कोटी रुपये अगोदरचे कर्ज फेडण्यासाठी मा. आयुक्त मनपा नांदेड यांना अधिकार देण्यात यावे. परंतू ज्या 90 कोटी मधून शहरातील अंतर्गत मुख्य रस्ते हॉटमीक्सचे रोड करण्यात यावे. या रोडचा समावेश करण्यात यावा. कारण त्यांचे ब-याच दिवसाचे कंत्राटदाराच्या कामाचे पैसे थकलेले आहेत. यासाठी 20 कोटीचा निधी स्वतंत्ररीत्या काढून ठेवावा. जेएनएनयुआरएममध्ये कामे करत असतांना शहरातील मोठे नाले सुटलेले आहेत. अशा नाल्यासाठी एक प्रस्ताव तयार करुन महाराष्ट्र शासनास पाठपुरावा करण्यात यावा. जो काही खर्च करावयाचा आहे तो खर्च स्थायी समितीपुढे आणुनच करण्यात यावा.

**तुलजेस यादव** आता जे आपण दिडशे कोटीचे कर्ज घेत आहोत ते कर्ज नांदेडच्या जनतेवर भुर्दंड पडणार आहे. या पैशातून फक्त नांदेडचा विकासाची कामे करण्यात यावी. इतरत्र हा निधी वळवण्यात येवू नये. नांदेड शहराच्या मुलभुत सोयी सुविधेसाठी वापर करण्यात यावा. रस्ते, नाल्या,ड्रेनेज, यासाठीच ही रक्कम खर्च करावी कोणत्याही कंत्राटदाराला ही रक्कम देण्यात येवू नये.

**बाळासाहेब देशमुख तरोडा** श्री उमेश चव्हाण यांनी ज्या सुचना मांडल्या आहेत त्याचे मी अनुमोदन करतो. नांदेड शहरातील जी विकासाची कामे करणे शिल्लक राहीले आहे. यात नगरोत्थान,जेएनएनयुआरएमची इतरही कोणते महत्वाचे कामे करावयाचे राहीले आहे यासाठी हा कर्जाचा निधी वापरण्यात यावा. तसेच शहरातील अंतर्गत रस्ते हे हॉटमिक्सने करण्यासाठी या निधीचा उपयोग करावा. यासर्व बाबीचा समावेश करुन ठराव हा यास करण्यात येतो आणि राज्य शासनास हा कर्जाचा प्रस्ताव पाठवावा.

**स.जानी म.कासीम** आपण जर विकासाच्या कामासाठी कर्ज घेतले तर कर्मचा-यांचे पगाराला पैसे राहणार नाहीत त्यासाठी या कर्जातून 15 कोटी रुपये वेगळे ठेवण्यात यावे.अशी यात तरतूद करण्यात यावी.मोठ मोठया कामासाठीतर शासनाकडून रक्कम येत असते परंतू लहान वार्डातील कामासाठी पैसे कोठून येणार आहेत. त्यासाठी यातूनच ठेवण्यात यावे वार्डातील महत्वाचे कामे करण्यासाठी या कर्जाचे पैसे वापरण्यात यावे.

**उमेश चव्हाण** मागील मनपा सर्वसाधारण सभेतील ठराव क्रं. 243 दिनांक 31.03.2015 अन्वेय ज्या सदरील ठरावातील नमुद कंत्राटदाराने बिएसयुपी योजने अंतर्गत टप्पा क्रं. 01 मधील पाणी पुरवठा व मलनिस्सारणची महानगरपालिकेने जी कामे करुन घेतलेली असुन संबंधीत कंत्राटदारास अद्याप पर्यंत त्यांचे देयक अदाई करण्यात आलेले नाही. करिता महानगरपालिका बिएसयुपी योजनेसाठी जे कर्ज

घेत आहेत त्या कर्जातुन सदरील ठरावातील नमुद कंत्राटदारास त्यांच्या थकीत असलेले देयक व त्यांचे दरवाढीनुसार (Prise Exletion) देय असलेल्या देयक अदाई करण्यास मान्यता देण्यात यावी.

**सभापती** श्री उमेश चव्हाण यांनी मांडलेल्या सुचने नुसार सर्वसाधारण सभेतील ठराव क्रं. 243 दिनांक 31.03.2015 अन्वेय ज्या सदरील ठरावातील नमुद कंत्राटदाराने बिएसयुपी योजने अंतर्गत टप्पा क्रं. 01 मधील पाणी पुरवठा व मलनिस्सारणची महानगरपालिकेने जी कामे करुन घेतलेली असुन संबंधीत कंत्राटदारास अद्याप पर्यंत त्यांचे देयक अदाई करण्यात आलेले नाही. करिता महानगरपालिका बिएसयुपी योजनेसाठी जे कर्ज घेत आहेत त्या कर्जातुन सदरील ठरावातील नमुद कंत्राटदारास त्यांच्या थकीत असलेले देयक व त्यांचे दरवाढीनुसार (Prise Exletion) देय असलेल्या देयक अदाई करण्यासाठी प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.१३५** **ठराव**

नांदेड वाधाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दि. १४.१०.२०१६ रोजीच्या ठाव क्रं ९४ अन्वये रुपये १५०.०० कोटीच्या कर्ज उभारणचा ठराव मंजुर केला होता त्यानुसार महापालिका प्रशासनाने कर्ज उभारणीसाठी पुढील एकूण ०७ वित्तीय संस्थांना / बँकांना मागणी पत्र पाठविले होते.

(१) सटेट बँक ऑफ हैद्राबाद नांदेड (२) स्टेट बँक ऑफ इंडिया नांदेड (३) अक्सीस बँक नांदेड (४) PMDO चेन्नई (५) HUDCO मुंबई (६) MUNIFRA मुंबई (७) ADB जपान

त्यापैकी HUDCO व PMDO या वित्तय संस्थांनी सर्व औपचारीक कागदपत्रे व प्रक्रिया पूर्ण करुन त्यांच्या कर्जा विषयीच्या अटी / शर्ती व व्याजदर महापालिकेला सादर केल्या आहेत सदर मुख्य अटी / शर्ती व दर या सविस्तरपणे सोबत सादर केल्या आहेत. (रक्कम कोटीत)

| विवरण | HUDCO | PMDO | कर्ज फेडीची मुदत |
|---|---|---|---|
| व्याज दर | ९.४३% | १०.५०% | -- |
| मुद्दल | १५०.०० | १५०.०० | १५ वर्षे |
| व्याज व इतर खर्च | १००.५५ | ११८.७७ | १५ वर्षे |
| एकूणण | २५०.५५ | २५८.७७ | |

मे. साले अन्ड कंपनीने सदर अटी / शर्ती व व्याजदराचा तुलनात्मक अभ्यास करुन सविस्तर अहवाल दिला आहे त्यांच्या मते HUDCO या संस्थेकडून कर्ज उभारणी करणे स्वस्त दराचे ठरेल. सदर प्रस्ताव हा महापालिकेच्या आर्थीक विषयाशी निगडीत असल्यामुळे HUDCO संसथेकडून कर्ज उभारणीस स्थायी समितीने मान्यता द्यावी. तसेच HUDCO या संस्थेकडून कर्ज उभारणी करीत असतांना कांही अडचण निर्माण झाल्यास PMDO या संस्थेकडून कर्ज उभारणीची मान्यता याच ठरावान्वये देण्यात यावी स्थायी समितीने मान्यता दिल्या नंतर सदर कर्ज प्रस्ताव महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येईल महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाल्यानंतर कर्जाची पुढील करार प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाकडून कर्ज मंजुरी मिळाल्यानंतर करावयाच्या सर्व आवश्यक नविन कर्जाची कार्यपध्दती पुर्ण करण्याकरिता तसेच जुने कर्ज परत करण्यासंबंधीच्या ही अटी व शर्ती पुर्ण करण्याकरिता स्थायी समितीने मा. महापालिका आयुक्त यांना संबंधीत सर्व आर्थीक करार (Financial Agreement) सुरक्षा अभिलेखे (Security Documents), हमी पत्रे (Undertakings), डीडस (Deeds) आणि लिखाण करण्याच्या (To execute) नुसार सुचविलेल्या व त्यांना मान्य असलेल्या बदलास व दुरुस्त्या (Amendments) करण्यास तसेच गहाण खत (To create Mortgage) तयार करुन आवश्यक असल्यास संबंधीत रजिस्ट्रार (Registrar) कडे (Indenture of Mortgage) व इतर Security Documents ठेवण्यास याच ठरावाव्दारे प्राधिकृत करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते. तसेच मनपाकेस प्राप्त होणा-या कर्ज रक्कमेतुन शहरातील मुख्य रस्त्यांचे हॉटमिक्स डांबरीकरण व शहरातील मोठया नाल्यांचे बांधकाम व दुरुस्ती करण्यासाठी ४०.०० कोटी रक्कम खर्च करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.

**विषय क्रं.०३**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीत दोन व्यायाम शाळा असुन शहरातील तरुणांना नागरिकांना कुस्तीचे महत्व पटवुन देवुन व त्यांना प्रशिक्षीत करुन त्यातुन शहरात उत्कृष्ट मल्ल / पहेलवान निर्माण करुन त्यांना राज्य पातळीवरील स्पर्धेत सहभाग नोंदविण्याची संधी प्राप्त करुन देण्यासाठी एका उत्कृष्ट कुस्ती प्रशिक्षकांची गरज लक्षात घेऊन वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच विहित पध्दतीचा अवलंब करुन निवड समितीसमोर सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. निवड समितीने गुणवत्तेनुसार श्री सय्यद बारी सय्यद महेबुब यांची कंत्राटी कुस्ती शिक्षण / प्रशिक्षक या पदावर दरमहा एकत्रीत वेतन रुपये ७,०००/- वर अंतिम निवड करण्यात आली. त्यानुसार संबंधीतास दरमहा एकत्रीत वेतन रुपये ७,०००/- वर व्यायामशाळा, स्टेडीयम या विभागासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रथम सहा महिण्याकरिता कंत्राटी तत्वावर कार्योलयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/१०५१२/१५ दिनांक १७.११.२०१५ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. ८७ दिनांक २२.०८.२०१२ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार संबंधीत व इतर ०४ असे एकूण ०५ कंत्राटी कुस्ती प्रशिक्षकांच्या एकत्रीत वेतनात कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/१६५१२/१६ दिनांक १४.०३.२०१६ अन्वये रुपये ५,०००/- एवढी वाढ करुन दरमहा एकत्रीत वेतन रुपये १२,०००/- दिनांक ०१.०३.२०१६ पासुन अदाई करण्यास मान्यता प्रदान केली.

श्री सय्यद बारी सय्यद महेबुब कंत्राटी कुस्ती प्रशिक्षक यांच्या सेवेची मुदत दिनांक १६.०५.२०१६ रोजी संपली आहे. संबंधीताचे काम समाधानकारक असुन त्यांच्या सेवेची मनपाकेच्या व्यायामशाळेस आवश्यकता आहे असे संबंधीत विभाग प्रमुखांनी अहवाल दिला आहे. त्यानुसार संबंधीतांच्या सेवेस दिनांक १७.०५.२०१६ रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक १८.०५.२०१६ ते १६.११.२०१६ पर्यंत तसेच संबंधीताच्या सेवेचा कालावधी दिनांक १६.११.२०१६ रोजी संपत असून, त्यांच्या सेवेस दिनांक १७.११.२०१६ रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक १८.११.२०१६ ते १७.०५.२०१७ पर्यंत संबंधीतांच्या सेवेस मुदतवाढ देण्या बाबतचा प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या मुदतवाढीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.१३६** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हद्दीत दोन व्यायाम शाळा असुन शहरातील तरुणांना नागरिकांना कुस्तीचे महत्व पटवुन देवुन व त्यांना प्रशिक्षीत करुन त्यातुन शहरात उत्कृष्ट मल्ल / पहेलवान निर्माण करुन त्यांना राज्य पातळीवरील स्पर्धेत सहभाग नोंदविण्याची संधी प्राप्त करुन देण्यासाठी एका उत्कृष्ट कुस्ती प्रशिक्षकांची गरज लक्षात घेऊन वर्तमानपत्रात जाहीरात देवुन तसेच विहित पध्दतीचा अवलंब करुन निवड समितीसमोर सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. निवड समितीने गुणवत्तेनुसार श्री सय्यद बारी सय्यद महेबुब यांची कंत्राटी कुस्ती शिक्षण / प्रशिक्षक या पदावर दरमहा एकत्रीत वेतन रुपये ७,०००/- वर अंतिम निवड करण्यात आली. त्यानुसार संबंधीतास दरमहा एकत्रीत वेतन रुपये ७,०००/- वर व्यायामशाळा, स्टेडीयम या विभागासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रथम सहा महिण्याकरिता कंत्राटी तत्वावर कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/१०५१२/१५ दिनांक १७.११.२०१५ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे.

मनपा सर्वसाधारण सभा ठराव क्रं. ८७ दिनांक २२.०८.२०१२ अन्वये मान्यता प्रदान केल्यानुसार संबंधीत व इतर ०४ असे एकूण ०५ कंत्राटी कुस्ती प्रशिक्षकांच्या एकत्रीत वेतनात कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साप्रवि/आस्था-सेल/१६५१२/१६ दिनांक १४.०३.२०१६ अन्वये रुपये ५,०००/- एवढी वाढ करुन दरमहा एकत्रीत वेतन रुपये १२,०००/- दिनांक ०१.०३.२०१६ पासुन अदाई करण्यास मान्यता प्रदान केली.

श्री सय्यद बारी सय्यद महेबुब कंत्राटी कुस्ती प्रशिक्षक यांच्या सेवेची मुदत दिनांक १६.०५.२०१६ रोजी संपली आहे. संबंधीताचे काम समाधानकारक असुन त्यांच्या सेवेची मनपाकेच्या व्यायामशाळेस आवश्यकता आहे असे संबंधीत विभाग प्रमुखांनी अहवाल दिला आहे. त्यानुसार संबंधीतांच्या सेवेस दिनांक १७.०५.२०१६ रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक १८.०५.२०१६ ते १६.११.२०१६ पर्यंत तसेच संबंधीताच्या सेवेचा कालावधी दिनांक १६.११.२०१६ रोजी संपत असून, त्यांच्या सेवेस दिनांक १७.११.२०१६ रोजीचा एक दिवसाचा तांत्रीक खंड देवुन दिनांक १८.११.२०१६ ते १७.०५.२०१७ पर्यंत संबंधीतांच्या सेवेस मुदतवाढ हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं. ०४**

मनपा कार्यक्षेत्रांतर्गत विष्णुपूरी जलशयाव्दारे शहरातील ६.५ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्येची तहान भागविणारे विष्णुपूरी जलाशय प्रकल्पावर अतिरिक्त पाणी उपसाचे तान एप्रिल व मे महिण्यात प्रचंड प्रमाणात वाढले असल्याची वस्तुस्थिती गेल्या ५-६ वर्षापासुन जाणवत आहे.

भविष्यात सदरची परिस्थी टाळण्यासाठी पाण्याचे पर्यायी स्त्रोत म्हणुन उर्ध्व पंनगंगा प्रकल्प कालावा पार्डी इस्केप व्दारे पाणी घेवुन पिंपळगांव (महादेव) व सांगवी हे दान कोल्हापुरी बंधा-यात साठवण करुन तेथून मनपाकेच्या काबरानगर येथील जलशुध्दीकरण केंद्रा पर्यंत पाणी पोहचविण्याचे पर्यायी प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले सदरील प्रकल्पामुळे नविन शहरातील पाणी टंचाई समस्या नियंत्रणात आली परंतु जुन्या शहरातील किल्ला व चौफाळा जलकुंभाव्दारे काबरानगर जलशुध्दीकरण केंद्रातुन पाणी पोहचविण्याचे माध्यम अस्तित्वात नव्हते.

एकीकडे गोदावरी पात्रातील पाण्याचे सतर अत्यंत कमी झाल्याने जुन्या शहरातील विविध भागात पाणी पोहचविणारे असदवन जलशुध्दीकरण केंद्रास पाण्याची कमतरता निर्माण झाली. वस्तुस्थितीनुसार मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मनपा नांदेड यांनी संयुक्तरित्या लेखी पत्राव्दारे देगलुरनाका पासुन चौफाळा जलकुंभापर्यंत प्रसतावित रायजींग पाईप लाईन टाकण्याचे काम करुन घेण्यास तसेच सदर कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येईल असे मा. आयुक्त मनपा याना लेखी पत्र दिले आहे. तसेच संबंधीत मा. पदाधिकारी मनपा यांनी मा. जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त मनपा यांना विषयांकीत काम त्वरीत हाती घेण्यास आवश्यकत्या कार्यवाहीस विनंती केली. मा. पदाधिकारी मनपा यांच्या समक्ष मा. जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त यांनी बैठकीत उपस्थित शासकिय कंत्राटदार मे. इंद्रजा कन्सट्रक्शन उस्मानाबाद यांना विषयांकीत काम चालु करण्यास मौखिक आदेश त्यांच्या समंतीने दिले होते सदर आदेशाप्रमाणे संबंधीत कंत्राटदाराने दि. २७ मे २०१६ रोजी प्रत्यक्ष कामाची सुरुवात करुन दिनांक ०६.०६.२०१६ रोजी सदरील पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण करुन दिलेले आहे.

एकूण १३७५ मी. लांबीच्या रायजींगमेन पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असुन पोलीस प्रशासना कडून परवानगी नुसार देगलुर नाका येथील क्रॉस कनेक्शन चे काम पूर्ण करण्यात येईल पाईप लाईन चाचणी नंतर रस्ता रिस्टोरेशनचे काम संबंधीत कंत्राटदाराकडून त्वरीत पूर्ण करुन घेण्यात येईल. रायजींगमेन पाईप लाईन कामाचे प्रस्ताव कार्यालयीन पत्र क्रं. मनपा /पापुवजनि/४३२/२०१६ दिनांक ०७.०४.२०१६ अन्वये सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आले होते त्यास दि. १४.१०.२०१६ रोजी ठराव क्रं. १०४ अन्वये सर्वसाधारण सभेने मे. इंद्रजा कन्सट्रक्शन कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकीय दरावर रु. ८१.०० लक्ष रक्कमेस सालसन २०१५-१६ च्या चौदाव्या वित्त आयोगा अंतर्गत मानयता प्रदान केलेली आहे.

करिता वरील प्रमाणे हे काम हाती घेणे बाबत झालेल्या वस्तुस्थिती नुसार सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या अवलोकनार्थ सादर.

**उमेश चव्हाण** जुन्या नांदेड शहरात काही अनूचित प्रकार होवू नये यासाठी तत्कालीन मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त, मा.महापौर,सभापती, उप आयुक्त यांनी स्थळ पहाणी करुन हे काम करण्याचे तोंडी आदेश दिले होते म्हणून हे काम विना निविदा झाले आहे. त्यास या सभेत मान्यता देण्यात येते व हा विषय याच सभेत पास करण्यात येते.

**बाळासाहेब देशमुख तरोडा** नांदेड शहरातील जुन्या भागातील काम हे कंत्राटदाराने केले असुन त्यांने पैसे न घेता हे काम केले आहे. त्यांने जे लिकीजेसचे काम केले आहे. इतर काही लिकीजेसचे का करणे शिल्लक राहीले असलयास ते पुर्ण करुन घ्यावे हा विषय पास करण्यात यावा.

**तुलजेस यादव** जुन्या भागातील काहीही क्रास कनेक्शनचे काम करणे शिल्लक राहीले आहे. ते करुन घ्यावे अजून काही कामे शिल्लक राहीले ते करुन घ्यावे.

**कार्यकारी अभियंता पापु** सालसन २०१५-१६ मागील वर्षी अत्यावश्यक काम असल्यामुळे व तिव्र उन्हाळयामुळे पाणीची टंचाई झालेली होती जुन्या नांदेड शहर जसे चौफाळा येथे अतिशय पाण्याचा त्रास झालेला होता त्या भागातील नागरीकांनी मा. जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त, यांना भेटुन या भागाचा पाण्याचा प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी विनंती केली होती तसेच मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती यांनी संयुक्त रित्या लेखी पत्राव्दारे देगलुरनाका ते चौफाळा जलकुंभापर्यंत प्रस्तावित रायजींग पाईप लाईन तात्काळ टाकण्यात यावे त्यास सभागृह मान्यता देईल असेही पदाधिका-यांनी प्रशासनास कळविलेले होते. त्यानुसार तत्कालीन जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त यांनी सदरील भागातील पाण्याचा प्रश्न तात्काळ निकाली काढावे असे आदेशीत केल्यानुसार देगलुर नाका ते चौफाळा पाण्याची टाकी पर्यंत रायजींग पाईप लाईन टाकण्याचे काम मे. इंद्रजा कन्सट्रक्शन कंत्राटदार यांच्या मार्फत करुन घेण्यात आलेले आहे व त्यांचे देयक रुपये ८१.०० लक्ष झालेले असुन त्यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात यावी.

**उमेश चव्हाण** कार्यकारी अभियंता पापु यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रशासनाच्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात यावी.

**बालाजी कल्याणकर** श्री उमेश चव्हाण यांनी जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** कार्यकारी अभियंता पापु यांनी दिलेल्या माहितीनुसार प्रशासनाच्या प्रस्तावास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते.

**ठराव क्रं.१३७** **ठराव**

मनपा कार्यक्षेत्रांतर्गत विष्णुपूरी जलशयाव्दारे शहरातील ६.५ लक्ष पेक्षा जास्त लोकसंख्येची तहान भागविणारे विष्णुपूरी जलाशय प्रकल्पावर अतिरिक्त पाणी उपसाचे तान एप्रिल व मे महिण्यात प्रचंड प्रमाणात वाढले असल्याची वस्तुस्थिती गेल्या ५-६ वर्षापासुन जाणवत आहे.

भविष्यात सदरची परिस्थी टाळण्यासाठी पाण्याचे पर्यायी स्त्रोत म्हणुन उधर्व पंनगंगा प्रकल्प कालावा पार्डी इस्केप व्दारे पाणी घेवुन पिंपळगांव (महादेव) व सांगवी हे दान कोल्हापुरी बंधा-यात साठवण करुन तेथून मनपाकेच्या काबरानगर येथील जलशुध्दीकरण केंद्रा पर्यंत पाणी पोहचविण्याचे पर्यायी प्रकल्प कार्यान्वीत करण्यात आले सदरील प्रकल्पामुळे नविन शहरातील पाणी टंचाई समस्या नियंत्रणात आली परंतु जुन्या शहरातील किल्ला व चौफाळा जलकुंभाव्दारे काबरानगर जलशुध्दीकरण केंद्रातुन पाणी पोहचविण्याचे माध्यम अस्तित्वात नव्हते.

एकीकडे गोदावरी पात्रातील पाण्याचे सतर अत्यंत कमी झाल्याने जुन्या शहरातील विविध भागात पाणी पोहचविणारे असदवन जलशुध्दीकरण केंद्रास पाण्याची कमतरता निर्माण झाली. वस्तुस्थितीनुसार मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मनपा नांदेड यांनी संयुक्तरित्या लेखी पत्राव्दारे देगलुरनाका पासुन चौफाळा जलकुंभापर्यंत प्रसतावित रायजींग पाईप लाईन टाकण्याचे काम करुन घेण्यास तसेच सदर कामास कार्योत्तर मान्यता देण्यात येईल असे मा. आयुक्त मनपा याना लेखी पत्र दिले आहे. तसेच संबंधीत मा. पदाधिकारी मनपा यांनी मा. जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त मनपा यांना विषयांकीत काम त्वरीत हाती घेण्यास आवश्यकत्या कार्यवाहीस विनंती केली. मा. पदाधिकारी मनपा यांच्या समक्ष मा. जिल्हाधिकारी तथा प्र. आयुक्त यांनी बैठकीत उपस्थित शासकिय कंत्राटदार मे. इंद्रजा कन्सट्रक्शन उस्मानाबाद यांना विषयांकीत काम चालु करण्यास

मौखिक आदेश त्यांच्या समंतीने दिले होते सदर आदेशाप्रमाणे संबंधीत कंत्राटदाराने दि. २७ मे २०१६ रोजी प्रत्यक्ष कामाची सुरुवात करुन दिनांक ०६.०६.२०१६ रोजी सदरील पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण करुन दिलेले आहे.

एकूण १३७५ मी. लांबीच्या रायजींगमेन पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असुन पोलीस प्रशासना कडून परवानगी नुसार देगलुर नाका येथील क्रॉस कनेक्शन चे काम पूर्ण करण्यात येईल पाईप लाईन चाचणी नंतर रस्ता रिस्टोरेशनचे काम संबंधीत कंत्राटदाराकडून त्वरीत पूर्ण करुन घेण्यात येईल. रायजींगमेन पाईप लाईन कामाचे प्रस्ताव कार्यालयीन पत्र क्रं. मनपा /पापुवजनि/४३२/२०१६ दिनांक ०७.०४.२०१६ अन्वये सर्वसाधारण सभेत सादर करण्यात आले होते त्यास दि. १४.१०.२०१६ रोजी ठराव क्रं. १०४ अन्वये सर्वसाधारण सभेने मे. इंद्रजा कन्सट्रक्शन कंत्राटदाराकडून अंदाजपत्रकीय दरावर रु. ८१.०० लक्ष रक्कमेस सालसन २०१५-१६ च्या चौदाव्या वित्त आयोगा अंतर्गत मान्यता प्रदान केलेली आहे.

करिता उक्त काम मागील वर्षी उन्हाळयात तिव्र पाणी टंचाईच्या काळात अत्यावश्यक काम असल्याने सदरचे काम मे. इंद्रजा कन्सट्रक्शन कंत्राटदार यांच्या मार्फत करुन घेण्यात आलेल्या कामास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते.

**विषय क्रं. ०५** **प्रस्ताव**

सध्या शहरात उन्हाळा सुरु झालेला असुन पिण्याच्या पाणीचे गंभर प्रश्न उदभवणार असल्याने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत अस्तीत असलेले विंधन विहिर (बोअर) अनेक भागात बंद पडलेले असल्याने नागरीकांना पाणी भेटावे म्हणुन बंद पडलेले बोअर तात्काळ सुरु करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** उमेशसिंह चव्हाण **अनुमोदक :-** सौ. सोनाबाई राचंद्रराव मोकले

**उमेश चव्हाण** भविष्यात पाणी टंचाई येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यासाठी शहरातील जे बोर आहेत, हातपंम्पाची दुरुस्ती येतया 4 दिवसात पुर्ण करुन घ्यावे. सिडको भागात आकोडे टाकून मोटार लावण्यात येत आहे. व इतर असे आकोडे टाकुन मोटार चालविण्यात येत असेल तर अशा सर्व ठिकाणी नियमाने मिटर घेण्यात यावे व पाणी पुरवठा सुरळीत चालू करावा.

**प्राधिकृत अधिकारी** शहरात एकुण 1000 पॉवर पम्प व हात पम्प आहेत याचा सर्व्हे करुन जे पम्प बंद आहेत ते दुरुस्त करुन घेण्यात येतील.

**उमेश चव्हाण** सध्या पाण्याची संदर्भातील विषय आहे. शहरातील ज्या ठिकाणी लिकेजेस आहेत ते पुर्ण काढून घ्यावे विष्णूपुरी जलाशयात सध्या 19 एमएमक्यु पाणी आहे. पुढील सहा महीने पाणी पुरेल ऐवढे पाणी आहे परंतू लिकेजेसने पाणी वाया जावू नये याची काळजी घ्यावी.

**तुलजेस यादव** जुन्या नांदेड मध्ये करबला रोडवरील पाण्याची पाईप लाईन 70 वर्षापुर्वीची आहे. त्या पाईप लाईनमधून पाणी घरात न जाता नालीत वाहून पाणी जाते ती लाईन बंद करण्यात यावी.

प्राधिकृत अधिकारी जुन्या नांदेडमधील पाण्याची लाईन ही जूनी आहे. त्यामुळे जुन्या शहरात लिकीजेस आहेत. आम्ही आता एएमआरसी नियुक्त करण्यासाठी निविदा प्रसिध्द करत आहोत निवीदा प्रसिध्द झाल्यानंतर लिकेजेसचे कामे करुन घेण्यात येतील.सिडकोमध्ये पाण्याची लाईनचे टाकण्याचे काम चालू आहे.दररोज दिड किलोमिटर लाईन टाकण्यात येत आहे. मार्च अखेरपर्यत हे काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे. यावर्षी सिडकोला पाण्याची समस्या निर्माण होणार नाही.ज्या ठिकाणी पाण्याची टंचाई आहे ते आपण काम सुचवावे ते काम प्रथम प्राधान्याने पुर्ण करुन घेवे.

**स. जानी म. कासीम** कधी काबरानगर तर डंकीची मोटर जळत असते ही दुरुस्तीला येते त्यामुळे दोन दोन दिवस पाणी मिळत नाही. ज्या ठिकाणी पाइप खराब झाले आहे ते तात्काळ बंद करण्यात यावे. सध्या नविन नांदेडला सुध्दा पाणी पुरेसे व वेळेवर मिळत नसल्याची नागरीकाची तक्रारी आहेत यांच्याकडे पुरेसा स्टाफ असला तरी कर्मचारी व अधिकारी काम करतांना दिसुन येत नाही पाणी सकाळच्या वेळेत येते त्यावेळेस अधिकारी लोक फोन उचलत नाहीत तयामुळे पाणी गेल्यानंतर आम्हाला अधिका-याचा काय उपयोग होईल त्यांनी त्यांची कामे जबाबदारीने केली पहिजेत ज्या ठिकाणी पाणी येत नाही त्या ठिकाणी तात्काळ उपाययोजना करण्यात यावी.

**सभापती** स. सदस्यांच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.१३८** **ठराव**

सध्या शहरात उन्हाळा सुरु झालेला असुन पिण्याच्या पाणीचे गंभर प्रश्न उदभवणार असल्याने नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत अस्तीत असलेले विंधन विहिर (बोअर) अनेक भागात बंद पडलेले असल्याने नागरीकांना पाणी भेटावे म्हणुन बंद पडलेले बोअर तात्काळ सुरु करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०६** **प्रस्ताव**

सध्या शहरात उन्हाळा सुरु झालेला असुन विष्णुपूरी जलशयाचा साठा दिवसेंदिवस कमी होत आहेत पुढील ४ महिण्यासाठी पिण्याच्या पाणी शहरवाश्यांना मिळणे आवयश्यक असल्याने मागील वर्षी तिव्र टंचाई झाली होती त्यामुळे शहरातील ज्या ज्या भागात पाण्याची गळती होत त्यामुळे सदरील गळती तात्काळ दुरुस्त करण्यास ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- उमेशसिंह चव्हाण **अनुमोदक** :- सौ. सोनाबाई राचंद्रराव मोकले

**सभापती** स. सदस्यांच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.१३९** **ठराव**

सध्या शहरात उन्हाळा सुरु झालेला असुन विष्णुपूरी जलशयाचा साठा दिवसेंदिवस कमी होत आहेत पुढील ४ महिण्यासाठी पिण्याच्या पाणी शहरवाश्यांना मिळणे आवयश्यक असल्याने मागील वर्षी तिव्र टंचाई झाली होती त्यामुळे शहरातील ज्या ज्या भागात पाण्याची गळती होत त्यामुळे सदरील गळती तात्काळ दुरुस्त करण्यास ही नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०७** **प्रस्ताव**

मनपा हद्यीत प्रभाग क्रं. ११ मगनपुरा भागात BSUP योजने अंतर्गत घरकुलांचे बांधकाम झालेले असल्या त्या ठिकाणी सदरील योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन तात्काळ टाकण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक** :- सौ. सोनाबाई राचंद्रराव मोकले **अनुमोदक** :- उमेशसिंह चव्हाण

**उमेश चव्हाण** स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत आपले अधिकारी वर्ग उघडयावर जाणा-या लोकांवर कारवाई करत आहेत. त्यावर कार्यवाही करण्यापुर्वी मनपाने त्या भागात काय सुविधा निर्माण केलेल्या आहेत तेथे ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे काय ते पहावे त्यांच्यावर कार्यवाई करणे चुकीचे आहे.

**प्राधिकृत अधिकारी** उघडयावर जाणे हे कायदयाने गुन्हा आहे शहरात पुर्ण भागात ड्रेनेज लाईन टाकण्यात आली आहे परंतू काही भागात ड्रेनेज लाईन नसेल तर सेप्टी टँक कम्युनिटी टॉयलेटचे बांधकाम केले पाहिजे, ड्रेनेज लाईन नाही म्हणुन या करणासाठी उघडयावर जाणे हे कायदयाने गुन्हा आहे.अशा लोकांवर कार्यवाही निश्चीत करण्यात येईल.

**उमेश चव्हाण** उघडयावर जाणे हे गैर आहे हे आम्हाला मान्य आहे पण मनपाने सुविधा देणे गरजेचे आहे.

**प्राधिकृत अधिकारी** नागरीकाने सेप्टी टँक करुन घ्यावा.त्यांनी उघडयावर जावू नये मनपाने आतापर्यत 18 हजार घरकुलाची कामे पुर्ण केलेली आहेत त्यामुळे लोकांनी उघडयावर गेले नाही पाहीजे व नविन योजनेत 51 हजार फॉर्म प्राप्त झालेले आहेत

**(गोंधळ चालू होता)**

**उमेश चव्हाण** एका बीएसयुपी घराच्या मागे आपणास 70 हजार रुपयाचा इन्फ्राचे मिळालेले आहेत. आपण ते काम केलेले नाहीत आम्ही लोकांना उघडयावर जावू नये म्हणुन सांगत आहोत परंतू लोक ऐकण्याच्या मानसिकतेत नाहीत ते म्हणतात ड्रेनेज लाईन कधी होणार याची विचरणा करतात

**(गोंधळ चालू होता)**

**प्राधिकृत अधिकारी** बिएसयुपीच्या संदर्भातील सर्व हिशोब आम्ही देण्यात तयार आहोत. त्याबाबतची सर्व माहिती प्रशासनामार्फत पुरवण्यात येईल. शहरात पाण्याची लाईन 450 किमीची टाकली आहे. नविन सर्व्हेनुसार 70 किलोमीटरची लाईन आणखीन टाकावी लागेल. शहर दिवसे दिवस वाढत आहे. आवश्यकतेनुसार लाईन टाकण्याचे काम हाती घेण्यात येईल या योजनेत काम झाले नाही तरी दुस-या योजनेतून काम हाती घेण्यात येईल. 6 लाख लोकसंख्या आहे त्यामुळे मनपाने एकाच भागात काम करणे शक्य नाही.

**उमेश चव्हाण** पाणी पुरवठा व ड्रेनेजच्या कामाला प्रशासनाने प्राधान्य दिले पाहिजे व पुर्ण केले पाहिजे.

**बाळासाहेब देशमुख तरोडा** योजनेची कामे आपा कधी पुर्ण होणे आवश्यक होते ती वेळेत का पुर्ण केले नाही याची माहिती सभागृहाला देण्यात यावी.टेंडरमध्ये ज्या अटी शर्ती होत्या त्या नुसार काम का करुन घेतले नाही या ठिकाणी प्रशासन चुकते.

**प्राधिकृत अधिकारी** सध्या तरोडयामध्ये ड्रेनेजचे काम करणे चालू आहे मागील एका वर्षापासुन निधी मिळाला नाही त्यामुळे काम हे विलंबाने होत आहे. निधी अभावि कामे होत नाहीत ही वस्तूस्थिती आहे.

**बाळासाहेब देशमुख** काम समाधानकारक होत काय याचा खुलासा करण्यात यावा.

**प्राधिकृत अधिकारी** प्रशासनाचे अधिकारी कुठे व कसा चुकला हे ठोस सांगावे त्यावर आम्ही कार्यवाही करु पण हे बरोबर नाही ते बरोबर नाही असे म्हणणे योग्य नाही.

**(गोंधळ चालू होता)**

**प्राधिकृत अधिकारी** — नांदेड हे एकमेव शहर आहे की ज्यामध्ये 18 हजार घरे संपर्ण भारतात नांदेड मनपाने बांधलेली आहेत. इन्फ्राची कामे का करण्यात आली नाहीत याची सविस्तर माहीती प्रशासनामार्फत सादर करण्यात येईल ज्या ठिकाणी 10 घरे झाली त्या ठिकाणी 90 घराचा इन्फ्राची कामे करण्यात आली आहेत. यामुळे निधी इन्फ्रावर खर्च करणे शक्य नाही. योजना 2006 ला मंजूर झाली त्यावेळी केवळ 100 घराची मागणी होती काही ठिकाणी आपण घरे शिप्ट झाली परंतू त्या ठिकाणी इन्फ्रा शिप्ट करता आला नाही कंत्राटदाराला 12 कोटी रुपये दिले असे सांगण्यात येते पण त्या कंत्राटदाराचे मनपाकेकडे 32 कोटी देणे आहे.शहरात ड्रेनेजची गरज नाही असे आम्ही म्हणत नाही स.सदस्यानी ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी त्यांच्या स्वेच्छा निधी दिला नाही हे कितपत योग्य आहे. आपण जसे म्हणता त्या पध्दतीने निधी खर्च करण्यात येईल.

**उमेश चव्हाण** — या समितीने कोणावरही कार्यवाही करण्याचे प्रस्तावित केले नाही भविष्यात करणार नाही असे मी तुम्हाला सांगतो.

**प्राधिकृत अधिकारी** — प्रशासन सगळया प्रश्नाची उत्तरे दयावयास तयार आहे आपण आरोप करीत जावे आम्ही त्याचे उत्तर देत जावू आम्ही प्रशासनात राहुन काम केले नाही हे म्हणने चुक आहे. काम का झाली नाही हे आम्ही सांगू.

**बाळासाहेब देशमुख** — आम्ही सुचना करतो ती बीएसयुपीची कामे का झाली नाही ही माहिती आपण देणार नाही काय हे सांगा.

**प्राधिकृत अधिकारी** — कोण काम करु दिले नाहि हे सर्व बाबी प्रशासनास माहित आहेत.

**उमेश चव्हाण** — आम्ही आरोप करत नाही. तर प्रशासनास सुचना मांडतो. जनतेची कामे झाली पाहीजेत असा आमचा उददेश आहे. आरोप करुन काय शहराच्या विकासात बाधा आणायची नाही शहरात 2700 कोटीची कामे झाली आहेत. व यातून 300 कोटी रुपये पाण्याच्या लाईनसाठी खर्च केलेले आहे तरी ही लोकांना पाण्यासाठी वनवन फिरावे लागते. एक संपली दुसरी घटना असे चालत राहणार आहे. ड्रेनेज लाईनची तुमच्या म्हणण्यानुसारच कामे चालू आहेत. स.सदस्य हे स्थायी समिती मध्ये आपल्या भावना त्यांचे प्रश्न जनतेला सुविधा मिळण्यासाठी करीत असतात त्यांची भावना समजून घेतली पाहीजे आपण गोरगरीबापर्यंत योजना पुरवल्या पाहिजेत.

**बाळासाहेब देशमुख तरोडा** — अधिका-याचे आमळी अभिनंदन केले आहे अधिकारी भ्रष्ट आहेत असा आमचा आरोप नाही पण शिल्लक राहीलेले कामे आम्ही पुर्ण करुन घेत आहोत.

**सोनाबाई मोकले** — गॅस गोदामापाशी घरकुले बांधलेले आहेत. त्या ठिकाणचे लोक रस्त्यावर कपडे धुतात. त्या पाण्याचा लोट भाटीया कॉम्पलेक्स पर्यत जातो त्या पाण्यातून शाळेची मुले यांना येजा करावी लागते तेथील सर्वे करा त्यांना सुविधा दया त्या ठिकाणी गाडया स्लीप होतात ये जा करण्यासाठी खुप त्रास होतो त्यावर उपाय योजना करावी.

**प्राधिकृत अधिकारी** — शहरात एकणु 40 ओडी स्पॉट आहेत. यापैकी 29 ठिकाणचे स्पॉट आपण ओडी फ्री केलेले आहेत. सिडकोमध्ये तीन स्पॉट आहेत आसदवन आसर्जन वसरणी या ठिकाणी आपण कम्युनीटी टॉयलेट बांधण्याचे नियोजन करणर आहोत दोन ठिकाणी मोबाईल टॉयलेट ठेवावयाची आहे. तरोडयातील कामे सुध्दा थांबवण्यात आले होते. ते काम देखील आपण पुर्ण होत आहे. आता त्या नागरीकांने पाईप लाईन टाकण्यास परवानगी दिले आहे. चार हजार घराचे हाऊस कनेक्शन देण्याचे शिल्लक राहीलेले आहे. एका दिवशी साधारणतः 350 घरे पुर्ण होत आहे येत्या 4-5 दिवसात हे काम पुर्ण होईल शहरात उघडयावर जाणारा एकही स्पॉट असणार नाही परंतू घरात संडास असुनही उघडयावर गेल्यास त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल. आपले शहर हागणदारी मुक्त शहर केले नाही तर केंद्र शासनाकडून आपणास निधी मिळणार नाही. यासाठी सर्वानी ओडी फ्री करण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**सभापती** — स. सदस्यांच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.१४०** **ठराव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. ११ मगनपुरा भागात BSUP योजने अंतर्गत घरकुलांचे बांधकाम झालेले असल्या त्या ठिकाणी सदरील योजने अंतर्गत ड्रेनेज लाईन तात्काळ टाकण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. ०८** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. ११ मध्ये मगनपुरा भागात दक्षीण मुखी हनुमान मंदिर परिसरात उद्यान विकसीत करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.

तसेच सदरील प्रभागात बळीराजा बिल्डींग ते श्री रकटे यांच्या घरा पर्यंत सि.सि. रस्ता करणे व मुक्तेश्वर आश्रम ते श्री गादेवार यांची किराणा दुकान पर्यंत सि.सि. रस्ता करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**सुचक :-** सौ. सोनाबाई राचंद्रराव मोकले **अनुमोदक** :- उमेशसिंह चव्हाण

**सभापती** स. सदस्यांच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.१४१** **ठराव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. ११ मध्ये मगनपुरा भागात दक्षीण मुखी हनुमान मंदिर परिसरात उद्यान विकसीत करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते.

तसेच सदरील प्रभागात बळीराजा बिल्डींग ते श्री रकटे यांच्या घरा पर्यंत सि.सि. रस्ता करणे व मुक्तेश्वर आश्रम ते श्री गादेवार यांची किराणा दुकान पर्यंत सि.सि. रस्ता करण्यास हि नावाशमनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येते.

**विषय क्रं. ०९** **प्रस्ताव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. १० मध्ये नविन पाणी पुरवठा लाईन टाकण्यास तसेच ड्रेनेजे लाईन टाकण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सुचक :-** सय्यद जानी म. कासी **अनुमोदक** :- चिखलीकर संदिप

**सभापती** स. सदस्यांच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी

**ठराव क्रं.१४२** **ठराव**

मनपा हद्दीत प्रभाग क्रं. १० मध्ये नविन पाणी पुरवठा लाईन टाकण्यास तसेच ड्रेनेजे लाईन टाकण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**विषय क्रं. १०** **अपिल** **दिनांक** ः- १८.०२.२०१७

**वाचा:-** महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) अन्वये अपिल

**प्रति,**
**मा. सभापती साहेब,**
**स्थायी समिती, नावाशमनपा नांदेड**

**महोदय,**

मा. सभापती महोदयाचे न्यायालयात मी बडतर्फीचे आदेशा विरुध्द खालील प्रमाणे अपिल सादर करीत आहे.

हे की, मी भुतपुर्वक नांदेड नगरपालिका नांदेड कार्यालयात दि. ०८.०३.१९९३ रोजी अनुकंपा कारणास्तव जकात जवान या पदावर नियुक्ती झालो सदर पदावर मी दि. १९.०३.९३ रोजी रुजु झालो आहे.

हे की, माझी वयोवृध्द आई व माझी मुलगी आजारी असल्यामुळे त्यांची सुश्रुषा व आजारपण करणेसाठी त्यांना घेऊन दवाखान्यात जावे लागत असे त्यामुहे मी कामावर उपस्थीत राहु शकत नव्हतो. या बाबत मला अनेक वेळा प्रशासनाकडून दंड आकारण्यात येऊन माझी सदर काळाची विना वेतनी रजा मंजुर झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे.

हें की, मी माझ्या कुटूंबातील एकमेव कर्ता पुरुष असल्यामुळे माझ्या कुटूंबातील सदस्यांच्या आरोग्याची खबरदारी घेणे हा माझा कर्तव्याचा भाग आहे. त्यामुळे मी कामावर अनुपस्थीत राहीलो आहे त्याचीही शिक्षा मला यापुर्वी मिळालेली आहे.

हे की, माझे लग्न झाल्यानंतर तब्बल अकरा वर्षानंतर मला मुलगी झाली ती नेहमी आजारी पडत होती तीच्या औषोधोपचारासाठी तिला मला दवाखान्यात न्याने लागत असल्यामुळे कामावर अनुपस्थीत होतो इतःपर उपचार करुन ही माझ्या मुलीचा मृत्यु दिनांक ११.०६.०३ रोजी गुरु गोविंदसिंघजी मेमोरीयल व रुग्णालय नांदेड येथे झाला त्यामुळे माझी मानसिक स्थीती अधिकच बिघडली माझ्या कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला मी दुःखी कष्टी झालो.

हे की, वरील कारणास्तव मी कामावर येऊ शकलो नाही ही बाब मी अनेक वेळा प्रशासनाच्या लक्षात आणुन देखील मी कोणत्याही प्रकारचा गंभीर गुन्हा केला नसतांना देखील मला मनपा सेवेतुन नियम बाहयरित्या दि. १८.३.०८ रोजी कायमचे सेवेतुन बडतर्फ करुन माझ्यावर अन्याय केला आहे.

हे की, महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील १९७९ चे नियम ५ मधील तरतुदीनुसार जबर शिक्षा देण्याची तरतुद आहे त्यामध्ये पोट कलम ९ मध्ये असे नमुद आहे की बडतर्फीची शिक्षा केवळ कोणतेही शासकीय काम करण्या बद्दल किंवा ते काम करण्यापासुन परावृत्त करण्या बाबत कायदेशीर परिश्रमीकाव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्ती कडून लालुच किंवा बक्षील म्हणुन कोणतेही इनाम स्वीकारल्याचा आरोप सिध्द झाला असेल तरच बडतर्फीची शिक्षा देता येईल अन्यथा नाही त्यासाठी विभागीय चौकशी होणे गरजेचे आहे.

हे की, मी केवळ अनाधिकृतणे गैरहजर होतो याची शिक्षा मला यापुवी झालेली आहे असे असतांना देखील मला बडतर्फीची नियम बाहयरित्या शिक्षा देऊन माझ्यावर अन्याय केला आहे.

हे की, बडतर्फीची शिक्षा देणे पुर्वी विभागीय चौकशी सुध्दा केली नाही मला निलंबीत केले नाही उलट महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदीचा भंग करुन मला सेवेतुन बडतर्फ केले आहे ते न्याय नाही सदरचा आदेश प्रशासनानी दिनांक १८.३.०८ रोजी निर्गमीत केला आहे तो बेकायदेशीर असल्यामुळे तो रद्दबातल करुन मला कामावर पुर्ववत पुन:स्थापित करावे.

हे की, बडतर्फीची शिक्षा ही जबर शिक्षा आहे सदरची शिक्षा देणे पुर्वी ठेवण्यात आलेले आरोप सुध्दा गंभीर स्वरुपाचे असले पाहिजे अशा प्रकरणात प्रथम निलंबीत करुन विभागीय चौकशी पुर्ण केली पाहिजे विभागीय चौकशी अंती लागलेले दोषारोप सिध्द झाले असेल तर अशी शिक्षा देता येऊ शकते परंतु माझ्या प्रकरणात लागलेले दोषारोप किरकोळ स्वरुपाचे आहे निलंबीत केले गेले नाहीत विभागीय चौकशी झाली नाही तरी ही नियम बाहयरित्या मला सेवेतुन बडतर्फ करुन माझ्यावर अन्याय केला त्यामुळे सदरचा बडतर्फीचा आदेश रद्दबातल होणे आवश्यक आहे.

हे की, माझी मानसिक स्थीती ठिक नव्हती माझ्यावर घोर अन्याय झाला मी जास्त शिकलेला नाही माझी आई नेहमी आजारी पडायची त्यामुळे मी विहित कालावधी मध्ये अपिल दाखल करुन शकलो नाही वरील परिस्थितीचा गांभीर्याने विचार करुन मा. महोदयांनी मला अपील करण्यासाठी झालेला उशीर क्षमापित करावा.

विनंती

मा. महोदयांनी विनंती करण्यात येते की मला अपिल करणेस झालेला विलंब क्षमावित करुन अपिल स्वीकारावे माझ्यावर बडतर्फीचा बेकायदेशीर लागलेला आदेश दिनांक १८.३.०८ हा रद्द बातल करावा व मला पुर्ववत कामावर पुन:स्थापित करावे ही विनंती.

अपिलार्थी
स्वाक्षरीत/-
रामेश्वर बेनिसिंह गहलोत
बडतर्फ जकात जवान, नावाशमनपा नांदेड

**सभापती** श्री रामेश्वर बेनिसिंह गहलोत, बडतर्फ जकात जवान यांनी दि. १८.३.०८ रोजी कायमचे सेवेतुन बडतर्फ करण्यात आलेल्या आदेशा विरुध्द केलेली अपिल मान्य करण्यात येत असुन नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं.१४३** **ठराव**

श्री रामेश्वर बेनिसिंह गहलोत, बडतर्फ जकात जवान यांना दि. १८.०३.२००८ रोजीच्या आदेशानुसार सेवेतुन बडतर्फ करण्यात आले होते संबंधीतांनी बडतर्फ केलेल्या आदेशा विरुध्द झालेला विलंब क्षमापित करुन सदरचे आदेश रद्द करुन पुर्ववत कामावर पुन:स्थापित करण्याबाबत केलेली अपिल मंजुर करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेले</u>**

**विषय क्रं.**

नावाशमनपा हद्दीत हिंगोली गेट ROB वर SDBC चा एक लेयर टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रु. ३२,६४,५००/- साठी ई टेंडर सेल व्दारे निविदा सुचना जा.क्रं. साबांवि/१२७७३/२०१६ दिनांक २३.१२.२०१६ अन्वये दैनिक उद्याचा मराठवाडा / दैनिक बहुरंगी वार्ता या वर्तमानपत्रात दि. २४.१२.२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ०३ (तीन) तिन निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दि. १६.०२.१७ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | अचबलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | अंदाजपत्रकीय दर |
| ०२ | गुरुरामदास कन्सट्रक्शन नांदेड | ४.९% जास्त दर |
| ०३ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५.५% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीत हिंगोली गेट ROB वर SDBC चा एक लेयर टाकणेच्याकामासाठी अबचलनगर इनफ्रास्ट्रक्चर नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेला निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं.१४४** **ठराव**

नावाशमनपा हद्यीत हिंगोली गेट ROB वर SDBC चा एक लेयर टाकणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रु. ३२,६४,५००/- साठी ई टेंडर सेल व्दारे निविदा सुचना जा.क्रं. साबांवि/१२७७३/२०१६ दिनांक २३.१२.२०१६ अन्वये दैनिक उद्याचा मराठवाडा / दैनिक बहुरंगी वार्ता या वर्तमानपत्रात दि. २४.१२.२०१६ रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आली असता उपरोक्त कामासाठी एकूण ०३ (तीन) तिन निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रीसदस्यीय समिती समोर दि. १६.०२.१७ रोजी उघडण्यात आल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| ०१ | अचबलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | अंदाजपत्रकीय दर |
| ०२ | गुरुरामदास कन्सट्रक्शन नांदेड | ४.९% जास्त दर |
| ०३ | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | ५.५% जास्त दर |

तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा अबचलनगर इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड यांची असुन ती अंदाजपत्रकीय दराची आहे.

करिता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत हिंगोली गेट ROB वर SDBC चा एक लेयर टाकणेच्या कामासाठी अबचलनगर इनफ्रास्ट्रक्चर नांदेड यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सभापती आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.